हे दोन्ही दिवस सभा घेऊन साजरे केले गेले. या सभेत चारशे-पाचशे लोक उपस्थित होते. सखाराम औटी यांनी झेंड्याला सलामी दिली तर गोविंदराव चामणीकर यांचे भाषण झाले. त्यानंतर सत्याग्रहींच्या अनेक तुकड्यांनी सत्याग्रह केले. १५ ऑगस्ट साजरा केल्याबद्दल श्री. वि. वा. देसाई यांना १ महिन्याची शिक्षा झाली. सरकारी रुसूम नाकारणाऱ्या विठ्ठलरावांना अशा शिक्षा कार्यापासूनच वंचित ठेवू शकत नव्हत्या. सुटकेनंतर पुढील कार्य त्यांनी भूमिगत राहून केले.

**जंगल सत्याग्रह** : स्टेट काँग्रेसच्या कृती समितीची २३ व २४ ऑगस्ट १९४७ रोजी विजयवाडा इथे बैठक झाली. या बैठकीमध्ये स्वातंत्र्यलढा अधिक तीव्र व सर्वंकष करण्याच्या दृष्टीने अनेकविध कार्यक्रम जनसामान्यांना दिले. जंगल सत्याग्रह हा त्यापैकीच एक !

सरकारला शिंदीच्या झाडापासून मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळत असल्याने, ही झाडे तोडण्यास कायद्याने बंदी होती. लोकांची चांगली जमीन या झाडांखाली अडकून पडली होती. पण सरकारला ना या जमिनीशी घेणं होतं ना वाढत्या व्यसनाधीनतेशी. सरकारी महसूल वाढतो आहे, एवढी एकच बाब त्यांना शिंदबन राखायला पुरेशी वाटत होती. जंगल सत्याग्रहाचा आदेश मिळताच, लोकांच्या संतप्त आणि त्वेषयुक्त कुऱ्हाडी शिंदीची झाडं भुईसपाट करू लागल्या. उभी जंगलं पाहता पाहता नामशेष होऊ लागली. परतूर तालुक्यातील कटाळा, गूळखंड, मोसा, वाई, यदलापूर, शिरसगाव अशी किती तरी गावंच्या गावं या जंगल सत्याग्रहात उतरली. वि. वा. देसाई, नानासाहेब आंबेकर, गणेशराव आंबेकर, ना. वि. देशपांडे, भीमराव माने, रामराव महाडिक आदींच्या मार्गदर्शनाखाली हा लढा यशस्वी झाला.

जनसामान्यांच्या लढ्याला आवर घालायला सरकारची शक्ती अपुरी पडू लागली तसं सरकार रझाकार गुंडांची मदत घेऊ लागले. रात्रीच्या वेळी डाके टाकणे, लूटमार करणे, कडबा जाळणे, माणसांवर हल्ले करणे असे दहशत पसरवणारे प्रकार सर्रास सुरू झाले. दिवसा वतनदार- पाटील-पटवारी यांच्या माध्यमातून शांतता सभा घ्याव्यात आणि रात्री रझाकारी अत्याचारातून धाकटपटशा दाखवावा. अशी दुहेरी खेळी निझाम खेळू लागला.

रझाकारांची ही अरेरावी विठ्ठलरावांनाही सहन करावी लागली. विठ्ठलराव एकदा गुळखंडकडून वाटूरकडे निघाले असता, रझाकारांनी झाडाच्या आडून



त्यांच्यावर बंदूक झाडली. सुदैवाने त्या बंदुकीत छर्रे होते. त्यातला एक छर्रा विठ्ठलरावांच्या हातात घुसला. जिवावरचे संकट हातावर निभावले. विठ्ठलरावांना श्रीधर जवळा येथे घराचा आश्रय देणाऱ्या श्री. काटे यांना मात्र रझाकारी अत्याचारात जिवास मुकावे लागले.

**रेल्वे वाहतुकीची मोडतोड :** स्टेट काँग्रेसच्या कृती समितीच्या आदेशाप्रमाणे परभणी जिल्ह्यातील भूमिगत कार्यकर्त्यांनी ऑक्टोबर १९४७ आणि फेब्रुवारी १९४८ मध्ये रेल्वे रुळ उखडण्याचे कार्यक्रम अमलात आणावेत.

श्री. वि. वा. देसाई यांच्या नेतृत्वाखाली परतूर व उस्मानपूर रेल्वे स्टेशन दरम्यान रेल्वे मार्गाची मोडतोड करण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यांच्यासोबत अमृतराव आंबेकर, हरिभाऊ गोसावी, अप्पाराव पाटील, वसंतराव चौधरी, आनंदराव कौसडीकर इ. कार्यकर्ते होते. वसंतराव चौधरींकडचे जिलेटीन व इतर साहित्य पोलीस तपासात जप्त करून फेकले गेले. अप्पाराव आंबेकरांनी हे साहित्य पुन्हा गोळा करून आणले. टेलिफोनच्या तारा तोडण्यासाठी एक जण खांबावर चढला असतानाच जवळच माणसांची चाहूल लागून कार्यकर्त्यांना हा उपक्रम अर्धवट सोडून द्यावा लागला.

**सशस्त्र लढा :** निझामाच्या एकतंत्री जुलमी राजवटीविरुद्ध शस्त्रसज्ज रझाकारांविरुद्ध अहिंसक लढा चालवणे फार काळ शक्य नव्हते. त्यामुळे स्टेट काँग्रेसच्या कृती समितीने निझामाच्या दडपशाहीविरुद्ध सशस्त्र प्रतिकार करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार हैदराबाद संस्थानाबाहेर सरहद्दीलगत सशस्त्र लढ्याची केंद्रे उघडून कार्यकर्त्यांनी लढा चालू ठेवला.

परतूर तालुक्यासाठी बुलडाणा जिल्ह्यातील सोनोसी येथे फेब्रुवारी १९४८ मध्ये कँप स्थापन करण्यात आला. श्री. विठ्ठलराव देसाई यांची कँपप्रमुख म्हणून आणि अमृतराव ऊर्फ नानासाहेब आंबेकर यांची कँप उपप्रमुख म्हणून नेमणूक करण्यात आली. परतूर तालुक्याच्या पांगरी येथे अंतर्गत कँप होता. सोनोसी कँपच्या स्थापनेपूर्वी १० जानेवारी १९४८ रोजी मंठा पोलीस ठाण्यावर केलेल्या हल्ल्यात वि. वा. देसाई, हरिभाऊ पुरी, अमृतराव आंबेकर, अप्पाराव आंबेकर सहभागी झाले होते.

सोनोसी कँपच्या सैनिकांनी वि. वा. देसाई आणि नायबराव देशमुख यांच्या नेतृत्वाखाली सरकटे वझर येथील करोडगिरी नाका, जयपूर येथील